पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६४५ दिनांक - २५/०८/२०२३**

लोणी काळभोर पोलीस ठाणे,पुणे शहर

## भेकराई नगर येथील एका डॉक्टरांचे अपहरण करुन २५,००,०००/- रुपये रोख व सोन्याचे दागीने लुटणारी टोळी लोणी काळभोर पोलीसांनी केली जेरबंद

तक्रारदार यांना एका अज्ञात नंबर वरुन फोन करुन कुत्रे आजारी असल्याचे खोटे सांगुन दि. ९/८/२०२३ रोजी वडकी येथील निर्जन स्थळी बोलावुन अनोळखी इसमांनी त्यांना एका नंबर प्लेट नसलेल्या चारचाकी क्वीड कंपनीचे गाडीत जबरदस्तीने बसवुन त्यांचे अपहरण करुन त्यांना जिवे मारण्याची धमकी देवुन तुमचे पत्नीने व मेहुण्याने तुम्हाला मारण्याची सुपारी दिली असल्याचे सांगीतले तसेच त्यांचा मोबाईल व घराचे चाव्या जबरदस्तीने घेवुन त्यांचे घरातुन २५,००,०००/- लाख रुपये रोख व २,१०,०००/- रु. किं. चे सोन्याचे दागीने ते अनोळखी इसम घेवुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिले तक्रारी वरुन ५१४/२०२३, भा द वि कलम ३६४ (अ), ३८६, ३९७, ५०६(२) ,३२३, ३४ भा ह का ४,(२५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. पोलीस उपायुक्त परि. ०५ पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख, तसेच मा. सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर श्रीमती अश्विनी राख, तसेच लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक प्रभारी अमित गोरे,व स्टाफ यांनी तपास सुरु करून तांत्रिक विश्लेषण केले असता तपासा दरम्यान असे दिसुन आले की यातील आरोपी यांनी अत्यंत चालाखीने व नियोजन बध्द रितीने कट रचुन कोणताही पुरवा पाठिमागे राहणार नाही याची पुरेपुर दक्षता घेतली होती. तांत्रिक विश्लेषण तसेच सी सी टी व्ही फुटेजचे आधारे आरोपी निष्पन्न करण्यात तपास पथकांनी यश मिळवले. आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपास केला असता सदर घटनेची अशी उकल झाली की ज्यामुळे पोलीसही चक्रावुन गेले.

तक्रारदार हे त्यांचे दुसऱ्या पत्नी सोबत राहण्यास असुन त्यांचे पहिले पत्नीची घटस्फोटाची केस न्यायालयात चालु आहे. त्यामध्ये फिर्यादी यांनी त्यांचे पहिले पत्नीस पोटगी रक्कम म्हणुन २०,००,०००/- रुपये देणे बाबत न्यायालयाचे आदेश झाल्याने फिर्यादी यांनी सदरचे रक्कमेची जुळवा जुळव करुन रक्कम घरात आणुन ठेवली होती. फिर्यादी यांची दुसरी पत्नी ही तीचे माहेरी बार्शी सोलापुर येथे गेली होती. घरात बोलता-बोलता तिचेकडुन नवऱ्याने घरात आणुन ठेवलेल्या पैशांचे बाबत तिची भावजय हिला समजले त्याप्रमाणे तिने तिचा मित्र राहुल निकम, व त्याचे इतर साथीदार यांना सोबततीला घेऊन फिर्यादी यांना लुटण्याचा कट रचला होता.

गुन्ह्यामधील आरोपी राणी पाटील हि तिने डॉक्टरांना फोन करुन त्यांचे घरा पासुन फार लांब नसलेल्या अंतरावर कुत्र आजारी असल्याचे सांगुन बोलावुन घेतले त्यानंतर बाकी साथीदारांनी डॉक्टरांचे जबरदस्तीने अपहरण करून प्लॅन नुसार त्यांनी नियोजन बध्द गुन्हा करुन डॉक्टरांना लुटले. परंतु लोणी काळभोर पोलीसांचे कौशल्यपुर्ण तपासा मुळे यातील आरोपी **१) माऊली ऊर्फ ज्ञानदेव महादेव क्षिरसागर, मुळ रा. वरकुटे खुर्द,ता. इंदापुर जि. पुणे सध्या रा. मु. पो. शेंद्री, ता. बार्शी, जि. सोलापुर २) राहुल दत्तु निकम, वय २७ वर्षे, रा. मु. पो. शहा, ता. इंदापुर, जि. पुणे ३) नितीन बाळु जाधव, वय २५ वर्षे, रा. मु. पो. शहा, ता. इंदापुर, जि. पुणे ४) सुहास साधु मारकड, वय २८ वर्षे, रा. मु. पो. पडस्थळ, ता. इंदापुर, जि. पुणे ५) विदया नितीन खळदकर, वय ३५ वर्षे, रा. ढगे मळा, कुर्डुवाडी रोड, ता. बार्शी जि. सोलापुर ६) संतोष धोंडीबा गोंजारी ऊर्फ राणी पाटील वय ३४ वर्षे, रा. मुळ रा. जगलबेट, ता. जोथाडा, जि. कारवार, कर्नाटक सध्या. मु. पो. लोणी देवकर, ता. इंदापुर, जि. पुणे** हे आरोपी निष्पन्न झाले असुन पोलीसांनी त्यांना अटक केली असुन त्यांचेकडुन गुन्हयात वापरलेली दोन कार, दोन मोटार सायकल, तक्रारदार यांचा मोबाईल हॅन्डसेट, तसेच आरोपीतांचे वापरते एकुण ६ मोबाईल हॅन्डसेट, सोन्याचे दागीने तसेच गुन्हयात लुटलेली बारा लाख रुपये रोख रक्कम असा एकुण २२,५५,०००/- रु. किं. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पो.उप-निरी अमित गोरे हे करत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर, श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५, श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त हडपसर विभाग, श्रीमती अश्विनी राख, लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री दत्तात्रय चव्हाण, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री सुभाष काळे यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप-निरी अमित गोरे, पोलीस अंमलदार सातपुते, गायकवाड, बोरावके, सायकर, देविकर, नागलोत, जाधव, कुदळे,शिरगीरे, विर,पाटील, सोनवणे, म.पो.शि फणसे, यांच्या पथकाने केली आहे.